# १० वसईचा रणसंग्राम अर्थात् चिमाजी अप्पाचा पोवाडा

(५६)

## स्फूर्तिदेवतांस अभिवादन
(ह्यांच्या साक्षीनें वसईचा विजय झाला)

वज्रेश्वरी तीर्थस्थानीं । वसे वरदानी । वज्रयोगिनी । पावली चिमाजींच्या नवसास ॥ जिच्या साक्षीनें घडे इतिहास । पुसूं तिज शौर्यक्रिया समयास ॥ जी ॥

वसईला गनिम खुडवून । वीर चिमाजीनं । केली स्थापन । गडावर मूर्ति मस्तीची ॥ कथा तिज पुसूं पौरुषाची । बहादर मर्द मराठ्यांची ॥ जी

(ध्रुपद) वसईचा दुर्ग घेऊन । मोठ्या शर्थीनं । चिमाजी आप्पानं । केलं उद्ध्वस्त फिरंगाण ॥ दिलं धर्मास अभयदान । शाहीर करी त्याचं शौर्यगान ॥ जी ॥

### चौक १

पंचरावें शतक अपशकुनी । लिस्बन सोडुनी । सागर मार्गांनीं । फिरंगी भारतांत घुसला ॥ व्यापाराच्या करुन निमित्ताला । धर्म-प्रसाराचा हेतु धरिला ॥

घेऊनी गोवा, दीव, दमण । साष्टीचं ठाण । वसई सर करून । पांढरे पाय रोवले फिरंग्यानं ॥ बाटवुन लोक धळधळानं । मांडला आकांत जळचरानं ॥

हे सागरी लुटारू साचे । फिरंगि त्यांचे । त्यांचिया जाचें । हवालदिल हिंदु प्रजा झाली ॥ दिसेना तिला कुणी वाली । पांचावर तिची धारण बसली ॥

किती झाले लोक परागंदा । सोडुन कामधंदा । म्हणती गोविंदा ! पूर्वजन्मीं पापकर्में केलीं ॥ म्हणुन हा लिहिसी भोग भाळीं । तार या संकटीं वनमाळी ॥

(चाल) फिरंग्यानं कसा छळ मांडला सांगतों तुम्हांला ॥

धडधडां हिंदु मंदिरें पाडती धरणीला ॥
त्या ठायीं चर्च बांधून क्रूस उभा केला ॥
तीर्थस्थानं आणि विहिरींमधें गोमांस पाव टाकला ।
जो हिंदु पियेल त्या जळा । तो धर्मभ्रष्ट जाहला ।
असे किती हिंदु ओढले ख्रिस्त कळपाला ॥
फिरंग्यानं हुकूम काढला । कुटुंबाचा प्रमुख जर मेला ।
तर त्याच्या विधवा पत्नीला । आणि पोरक्या पोरांबाळांला ।
ख्रिस्तीविण नाहीं गती बाटवावें त्याला ॥
कोणाचा विरोध जर झाला ।
करा जप्त त्याचं घरदार मालमत्तेला ॥

(चाल) व्रत होम यज्ञयागास । झाली बंदी फिरंगाणास ॥
देवू नका शेंडी ठेवण्यास । फर्मान निघालें खास ॥
कर द्यावा लागेल जगण्यास । अशी तंबी दिली लोकांस ॥

(चाल - धन्य शिवाजी)

(पट्टी पांचवी मध्यम)

कान्हेरीचीं लेणीं पाडुन चर्च उभारियलें ।
तिथें ख्रिस्ती धर्माची शाळा, मठहि स्थापियले ॥
लेण्यामधल्या बुद्ध मूर्तीला नेमके पकडूनी ।
नांव रेपॅसो त्याचें ठेविलें, धर्म बाटवूनी ॥
मंडपेश्वर मंदिरांत होतें पवित्र शिवलिंग ।
फिरंग्यानें तें मंदिर पाडुन केली मूर्ति भंग ॥
अनाथ झाला विश्वनाथ तो नाथ अनाथांचा ।
दुबळा ठरतो परमेश्वरही दुबळ्या भक्तांचा ॥
सुशील ब्राह्मण व्यवसायानें प्रसिद्ध ज्योतिषी ।
रहात होता फिरंगाणामाधीं पुरुषोत्तम जोशी ॥
त्याला शासन करी फिरंगी नसतां कांहीं गुन्हा ।
बाटविलें त्या, नांव ठेविलें, 'आंद्रेक द कुन्हा' ॥

अबलांचा केला छळ।
विप्रांचे आले हाल।
गाईस पातला काळ।
येशूच्या नांवास कालिमा त्यांच्या करणीनें।
मान ममांतिल बापाची हो खाली शरमेनें॥

## चौक २

(चाल) धर्मासि आली अवकळा। बघुन त्या छळा। आत्म कळवळा।
अणजूरकर गंगाजी नाईकाला॥ अंताजी रघुनाथ संगतीला।
गाऱ्हाणं नेतां छत्रपतीला॥

(चाल) तुम्ही शिवाजीचे वंशज कसे म्हणवीतां।
कां हिंदु धर्म रक्षक ब्रीद मिरवीतां।
कशी सुखें नीज ये साप उशाशीं असतां।
फिरंग्यानं धर्म बुडविता। रे तुडविता। तुम्हांविण आतां। कोण हो त्राता॥
शाहूनं ध्यान देऊन ऐकिली अर्जी।
दिलं अभय गंगाजी नाईकास झाली मर्जी।
निजामाशीं परी गुंतला पेशवा फर्जी।
ही चिंता मानसामाजी। नसे जर बाजी। पाठवूं आजी। कोण रणगाजी॥
दरबारीं जमलेले होते शूर सरदार।
त्यामध्यें चिमाजी आप्पा होता झुंजार।
ज्यानं कपटी सिद्दी सातचा केला संहार।
रणीं ज्यास सदा तलवार। विजय देणार। बघुन ज्या हार। हार खाणार॥

(चाल) राजाचं इंगित जाणुनी। चिमाजी उठुनी। मुजरा घालुनी।
नम्रपणें बोलला भूपतीला॥ हुजुर! जर आज्ञा होईल मजला।
जातों मी वसई मोहिमेला॥

शिवाजीच्या विसरूनी खड्गा। संभाजीच्या कड्गा। फिरंगी कोडगा।
आगळीक करी पुन्हां मुलखास॥ आम्च्या शत्रूंना करी साह्यास। धिंगाणा
घाली पश्चिम दर्यासि॥

परकीयांच्या जुलुमापासून। प्रजारक्षण। धर्मपालन। और हिंदवी
स्वराज्याचें॥ बांधू कंकण प्रतिज्ञेचें। करूं पारिपत्य फिरंग्यांचें॥

(चाल) शाहूची संमती मिळतां। मोहीम केली मुक्रर॥
फिरंगाणा मारण्याकरितां। चिमणाजी निघाला वीर॥
मोहीमेची सांगण्या वार्ता। वायु आधीं निघे सत्वर॥

(चाल-फटक्याची)

मजल दरमजल करित चिमाजी येई फिरंगाण बुडवायाला।
पळ, पळ, पळ, पळ आतां फिरंग्या, संभाळ संभाळ जिव अपुला॥
फिरंगी शिशुपाला पापांचे घडे पुरेपुर तव भरले।
स्मर आकाशांतिल बापाला धैर्य धरून उरलें सुरलें॥
वर्षप्रतिपदा सुमुहूर्तावर उभारुनी विजयाची गुढी।
दुसऱ्या दिवशीं निघे चिमाजी साथ घेऊनी फौज खडी॥
दो आघाड्यांवरती लढण्या साष्टीकडे अन् वसईकडे।
सैन्याच्या दो तुकड्या केल्या चाराया फिरंग्यास खडे॥

(चाल) मिळतांच इशारत वीर चालले पुढें॥
खंडोजी माणकर निघाले साष्टीकडे॥
त्यांना साथ देती होनाजी वीर बळकवडे॥
खणण्यास वसई कोटाचे बुरुज ते खडे॥
अणजूरचे गंगाजी नाईक चालले फांकडे॥
शंकराजी फडके वीर बिनीस खडे॥
महापराक्रमी सुंजार वीर चहुंकडे॥
पाहुनी धडकी फिरंग्यास, उर धडधडे॥

(चाल - सांगट) मराठ्यांनी पहिल्या धडाक्याला । हर हर महादेव घोष केला । चौथ्या केळ्या साष्टीच्या वेशाला । सोपारें, आगाशी, अर्नाळ्याला । बेलापूर गांव काबीज केला । फिरंगी राहून इशाराला । मरोळची खाडी सोडून गेला । पारशिक किल्ला सर झाला । गोवर्धनी देवीनं कौल दिधाला । म्हणून जिवधन हातीं आला । फिरंगी पाड्याचा पाडाव झाला । केला मला मांडवी=वर हल्ला । तोफा डागतांच बुरुजाला । फिरंग्यानं किल्ला खाली केला । चकमक झाली रकमकाली । फिरंग्याचा राका ढिला केला । बेलापुरीं पडका कोट पडला । सायवान किल्ल्यास वेढा दिधाला । जरब दावून सर केला । सांताक्रूझास जाम बसला । कालदुर्ग किल्ला हातीं आला । तीच गत झाली मनोराला । तांदुळवाडीचा कबजा केला । पाठोपाठ मिळवून विजयाला । फिरंगी जळीं स्थळीं पिटला रं ।। मराठ्यांनी ।। दादा ।।

परी पुढं फासा उलटा पडला । मराठा गेला वेसाव्याला । तीन वेळां झडून हल्ला केला । फिरंग्यानं परी नेट धरला । निकराचा प्रतिकार केला । अपेश वाट्या आलं मराठ्यांला । होनाजी बाळकवडे कष्टी झाला । वांद्र्याचा वेढा निकामी ठरला । मोराजी नाईक बळी पडला । कितिक वीर जायबंदी झाले । फिरंग्यानं घेतलं धारा-वीला । सेनापति पेद्रु रमेल आला । वसईचा किल्ला राखण्याला । मराठ्यांनी तीनदां यत्न केला । वसईचा किल्ला जिंकण्याला । फिरंग्यानं आगमार केला । गुणाजी शिंदे रणीं पडला । खंडोजी मागराव खपला । दादाजी नाईक स्वर्गी गेला । नामांकित वीर चालून गेला । बाजी भिवराव नांव ज्याला । फिरंग्यानं परी चोप दिधाला । बाजी भिवराव मागें फिरला । मराठा नामोहरम झाला । शेंकड्यांनी वीर जिवास मुकला रं ।। खरोखर ।। दादा ।।

तिकडे माहीमास कहर झाला । फिरंग्यानं काय डाव केला । मराठा कोंडींत पकडीला । मागुन पुढुनियां मारा केला । दादाजी प्रभु कामास आला । कितिक हशमांनी स्वर्ग धरिला । शिरगांवच

हल्ला फुकट गेला। अखेरी मनोर धारावीला। मराठा पराभूत केला रं॥
फिरंग्यानं॥ दादा०॥

(चाल) प्रतिकूल दैव जाहले। पराजित झाले। मराठे थोर। परी युद्धास
नाही विसरले॥ मरती रणीं नाहीं कधीं हरले। येऊन मरहट्टे
नांव नरले!॥

चौक ३

(चाल) जसा चेंडू आपटतां खालीं। त्वरेनें भाली। मारितो उसळी।
शर्थ केली तशीच मराठ्यांनी॥ पराजयावरती मात करुनी।
पाजलें खड्गाचें रिपुस पाणी॥
फिरंग्याच्या काढाया कांटा। जिरवाया ताठा। जिथे मरहट्टा।
एकवटून पुन: फौजफांटा॥ रोखू नोडतीच्या (उत्तरेच्या) सर्व
वाटा। भिडला पुन: वसई साष्टी बेटा॥

(~~आल~~) आली पोर्तुगालहून मदत पेद्रु रमेलाला॥
एक हजार शिपाई, गलबतें, शस्त्रें, दारुगोळा॥
आतां टाका पिटून ~~हि~~ हुसकून झणी मराठ्यांला॥
असा खलिता व्हाईसरायानं धाडला पेद्रूला॥
हुकुमाचा बंदा बहाद्दर पेद्रु बघा झाला॥
नवी कुमक घेऊन त्यानं केला हल्ला तंण्याला॥

(चाल) मचव्यांत बसुन त्या वेळां। किल्ल्याचा लाग बघण्याला।
पेद्रु रमेल फिरंग लागला। तोंच काय प्रकार जाहला।
मराठ्यांनी किल्ल्यावर दिली बत्ती तोफेला॥
धाडकन गोळा पेद्रूच्या अंगावर पडला॥
सरसेनापती फिरंग्यांचा गारद झाला॥

(चाल) सेनापति मृत्युमुखीं पडतां। अवसान पुरे शत्रूला॥
रणांतून पाय काढला। वसईच्या किल्ल्यामधिं लपला॥

(चाल-धन्य शिवाजी)

पेद्रूनंतर आला सेनापति मार्तिन सिरवेल।
कसा त्यास मरहट्ट्यांपुढती टिकाव धरवेल॥
चिमाजी आप्पा खासा जातीनं खनपरीस बसला।
गाळण उडुनी फिरंगी सोडी माहिमच्या किल्ला॥
माहिम जिंकुन घेई मराठा केळवें कबजांत।
शिरगांवी दे शेर्पीकरांच्या हाथ पेकाटांत॥
अजिंक्य बांका तारापुरच्या गड सर करण्याला।
तिथे मराठी निशाण भगवें तिथे ठाले भाला॥

(चाल) मराठ्यांचे वीर फांकडे। धातीन्चे निधडे। चालले गडाकडे।
बाजी भिवाजी रेटरेकर।
राणोजी भोसले नरवीर।
पराक्रमी शिंदे होळकर।
ते पटवर्धन झुंजार।
रणमस्त बाडे सरदार।
यशवंत तुकोजी पवार।
हर हर गर्जुनी तयास भिडले कृतांत काळ जसे।
समरविलासापुढें जिवाचें ज्यांस भान नसे॥

(चाल) धडधडां सुरुंग उडोनी बुरुज ढांसळले॥
पडतांच तयास भगदाडं मराठे धांवले॥
गडावरनं परी शत्रूनं निशाण साधीले॥
नेम धरून हुकुमी तोफांचे गोळे उडवीले॥
बंदुकीच्या गोळ्यांनी किती टिपून मारले॥

आगीनं मराठी वीरांस भाजून काढलें।
छातीचा कोट करुनियां फिरंगी लढले॥
सुजाणे हिंमतीनें सहजीं नाहीं आपले॥

(चाल) दांत ओठ करकरां खाऊन। पुन: ये चालून। हाराकिरी करून। मराठा वेगें तुटून पडला॥ जिवावर उदार होऊन लढला। तारापूर किल्ला फत्ते झाला॥

मराठ्यांची झाली जरी बाजी। संगरामाजी। परी रणगाजी। बाजी भिवराव रणीं पडला॥ (रेरेकर बाजी रणीं पडला॥) गड आला परी सिंह गेला। चिमाजी अंतरीं कष्टी झाला॥

माहीमच्या किल्लेदाराला। लुईस बोतेल्होला। रणीं काळ आला। दफन त्याचें केलं सन्मानानं॥ केलं त्याच्या स्त्रीचं सांतवन। धन्य दिलदार चिमाजी धन्य॥

चौक ५

पद्य
क्रमांक ५

(चाल) तारापुरच्या कोटावरुनी हुसकुनी गनिमाला।
मराठा गेला वेसाव्याला॥
वेसाव्यावर झेंडा रोवुनी मढ धारावीला।
जिंकुनी जोडी स्वराज्याला॥
व्यंकटराव घोरपडे उपसतां हत्यार गोव्याला।
फिरंगी गर्भगळित झाला॥
सांधे साधुनी सावंतानीही बारदेश मिळाला।
मोठा उत्पात मांडियेला॥
शिरला मानाजी आंग्रे इकडे उरणच्या खाडीला।
गिळितसे करंजे बेटाला॥
मोर्चा लागतां इकडच्या मार्ग बंद झाला।
कोंडला जाळ्यावर वसईला॥

चहूंकडुनी आकाश फाटतां प्रश्न मोठा पडला।
फिरंगी गांगरून गेला ॥

(चाल) गनिमाला पडता काळ आला। सरला दारुगोळा। खजिना संपला। फौजही रणीं खूप पडली॥ बाहेरची कुमक बंद झाली। वसईची नाकेबंदी झाली॥

व्हाईसरॉय धाडी हुकुमास। सोडा उद्धारास। वसई मुलुखास। सूचेना आदेश सिरवेलास॥ नामुष्की शिकवूं नका आम्हांस। जबाब दिला धाडुन व्हाईसरॉयास॥

सिरवेलाच्या झाला निर्धार। जाणार नाही हार। झुंज करणार। सिद्ध प्रतिकार करायाला। वसईचा बंदोबस्त केला। किल्ल्यावर दबा धरून बसला॥

मराठ्यांचे वीर अग्रणी। जमले नरमणी। वीर शिरोमणी। सत्यधर्माच्या धरून पक्षा॥ घेऊन आले सैन्य दोन लक्ष। करण्या फिरंग्याचा कपाळमोक्ष॥

चौक ५

वसईचा किल्ला परी बांका। पाण्यांतील रेखा। जणु जणू लंका। खाडी पश्चिम दक्षिणेला॥ खाजण, चिखल उगवतीला। रेताड वाळवंट उत्तरेला॥

तीन बाजूंस दक्ष राहून। बाहू पसरून। शत्रूपासून। दर्या रक्षण सदा करणार॥ फिरंग्याला ज्याचा मोठा आधार। म्हणुन निर्धास्त मनीं असणार॥

मराठ्यांनी उत्तरेकडून। मोर्चेबंदी करून। धामधूम करून। डागल्या तोफा वसई दुर्गावर॥ गनिमही सावध होता किल्ल्यास। निकामी करी तोफा समयास॥

(चाल) तयावरून करी भडीमार गनिम बेहद्द ॥
परि चिवट मराठे धन्य तयांची जिद्द ॥
उडवाया कोट यांनीं केले सुरुंगाहि सिद्ध ॥
गनिमावर तुटनी पडती होऊनी क्रुद्ध ॥
निकराचें युद्ध करतांना हरपली शुद्ध ॥

(चाल) काळ तीन महिन्यांचा गेला । नाहीं पडला वसईचा किल्ला ॥
आपल्याच क्रोधे भडकला । रागानं बेभान झाला ॥
त्वेषानं बोले लोकांला । तुम्ही भित्रे भागूबाई झाला ॥
तुम्हां गनिम होईजड झाला । थू: तुमच्या जिनगानीला ॥
जर किल्ला नाहीं सर झाला । धिक्कार तुमच्या शौर्याला ।
अपकीर्ति तुमच्या नांवाला । डाग लागेल मराठी कुळाला
लागेल बट्टा वंशाला । बदलौकिक इतिहासाला ॥

(चाल) काय जाऊन सांगू भुपाला । चिमाजी म्हणाला । रणीं
कचरला । मराठी वीर बघुनी गनिमास ॥ पळ
काढला टाकून शस्त्रास । बेहत्तर येऊन वरीन मरणास ॥
सर नाहीं होत जर किल्ला । बांधावें मला । म्हणीं
तोफेला । मुंडकें तरी उडवा माझें किल्ल्यास ॥ यावें
समाधान एवढें जीवास । दुजी नच उरली अंतरीं आस
चिमाजीचे शब्द ऐकले । जिव्हारीं भिडले । भान हरपले
मराठ्यांना चेव भारी आला ॥ त्वेषानं पुन: करती हल्ला
शत्रुरक्तानं वीर न्हाला ॥
जीवावर होऊन उदार । करती संगर । फिरंगी वीर ।
परी इतक्यांत घात झाला ॥ तोफेचा एक उडुनी गोळा ।
मर्तिन सिरवले ठार झाला ॥
किल्लेदार पडतां समरांत । उडाला आकांत ।
शत्रु सैन्यांत । प्रतिकाराचा जोर सरला ॥ फिरंगी

टाकून इत्यासाठा । सोरटच्या दावी निशाणाला ॥
मराठ्यांनचि केला सीमापारी गुंड चाकचर दुष्ट धनचोर
कथा सांगतो पहा इतिहास ॥ स्फूर्ति येऊं दे श्रोतृवृंदास।
वसन्तराय शाहीर करी कवनास ॥

मुम्बई — ० —

रचनाकाल २.६.१९६७
ते १०.६.१९६७.

(दि. १०. जून १९६७ ला दादरच्या वनमाळी सभागृहांत ह्या पोवाड्याचें प्रथम गायन झालें. सावेळीं श्री. ह.गो. वर्तक (मंत्री-महोदय) उपस्थित होते. त्यांना पोवाडा व कार्यक्रम आवडला. प्रा. य.ना. देवधरहि उपस्थित होते. त्यांनाहि पोवाडा आवडला.
२रा कार्यक्रम ७.२.१९६८ ला वसईला झाला. तोहि छान झाला.
या पोवाड्याची १ली आवृत्ति इ.स.१९६८ साली पाठक प्रकाशनानें काढली. २ री आवृत्ति नातिवडेकर शाहिरी संगमने काढली. ना. शा. संगमच्या शिबिरांमधून पोवाडा विद्यार्थ्यांना शिकविला व वितरितहि केला. आज प्रत उपलब्ध नाहीं.
पोवाडा य.न. केळकरकृत 'वसईची मोहीम' ग्रंथाच्या आधारें लिहिला आहे. य.न. यांचा अभिप्राय 'तुमचा पोवाडा ऐतिहासिक संदर्भ म्हणून फार मोलाचा आहे. इतिहासाचे विद्वान प्रा. य. न. देवधर यांनीहि पोवाड्याची निःपक्षपाती वर्णन म्हणून भलामण केली. डॉ. रवींद्र रामदास यांनीं तर हा पोवाडा लिहिण्याची प्रेरणा दिली होती. त्यांना हा पोवाडा खूपच आवडला.